**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०३ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. कर्जाचा आगाऊ भरणा करणाऱ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी करण्यावर रिझर्व्ह बँकेचे निर्बंध.
2. बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये शिष्यवृत्ती तसंच प्रवेशासाठी समान धोरण राबविण्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आश्वासन.
3. राज्यात विवाहपूर्व थॅलेसिमिया रोगाची चाचणी बंधनकारक करण्याची सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची विधानसभेत ग्वाही.
4. वाळू आणि रेती वाहतुकीसाठी चोवीस तास परवानगी देण्याचा निर्णय- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती.

---------------------------------------

**रिझर्व्ह बँक**

कर्जाचा आगाऊ भरणा करणाऱ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी करण्यावर रिझर्व्ह बँकेने निर्बंध लादले आहेत. गैर व्यावसायिक कर्ज घेणाऱ्यांकडून अशा प्रकारचे शुल्क कोणत्याही बँक किंवा वित्तीय संस्थेने घेऊ नये असं रिझर्व्ह बँकेने म्हटलं आहे. येत्या आर्थिक वर्षापासून यासंदर्भातले दिशा निर्देश लागू होणार आहेत. सरकारी आणि खासगी बँका, सहकारी बँका, गैर बँकिंग वित्तीय संस्था यांना हे दिशानिर्देश लागू होतील. कर्जाचा पूर्ण किंवा अंशतः भरणा केला तरी तसंच कुठल्याही किमान कालावधीच्या अटीशिवाय हे दिशा निर्देश लागू होतील. ज्या कर्जांना हे दिशा निर्देश लागू होणार नाही, त्या कर्जाच्या मंजुरी पत्रात याचा स्पष्ट उल्लेख करण्याचे आणि शुल्काची रक्कम लिहिण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेने दिले आहेत.

---------------------------------------

**पंतप्रधान नरेंद्र मोदी-घाना**

पंतप्रधान नरेंद्र मोदी घाना, त्रिनिदाद, टोबॅगो, अर्जेंटिना, ब्राझील आणि नामिबियाच्या दौऱ्यावर आहेत. त्यांना घानाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार

Companion of the Order of the Star of Ghana **या पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. दुपारी त्यांनी घाना इथल्या संसदेत भाषण केलं. भारत आफ्रिका संबंध याबद्दल त्यांनी आपल्या भाषणात विशेष बाब नमूद केली......**

*(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी)*

*इतना सुखद संयोग है कि भारत के कई गौरव भरे क्षण में अफ्रीका जुड़ा हुआ है। जब भारत ने चंद्रयान के चाँद के साउथ पोल पर लैंड किया तो उस दिन भी मैं अफ्रीका में था और आज जब। एक भारतीय एस्ट्रोनॉट मानवता के उज्वल भविष्य के लिए स्पेस स्टेशन में एक्सपेरिमेंट्स कर रहा है, मैं एक बार फिर अफ्रीका में हूँ, अफ्रीका हैज़ बीन कनेक्टेड टू मैनी ऑफ इंडिया प्राउडनेस मोमेंट्स इन स्पेस।*

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घाना येथील एक्रा शहरातील नक्रुम्हा मेमोरियल पार्कला भेट दिली आणि घानाचे पहिले राष्ट्राध्यक्ष आणि आफ्रिकन स्वातंत्र्य चळवळीचे अग्रणी डॉ.क्वामे नक्रुम्हा यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्यासोबत घानाच्या उपराष्ट्राध्यक्ष महामहीम प्रा.नाना जेन ओपोकू-अजेमांग उपस्थित होत्या. पंतप्रधानांनी डॉ.नक्रुम्हा यांच्या स्मृतीस्थळी पुष्पचक्र अर्पण केले आणि स्वातंत्र्य, एकता आणि सामाजिक न्यायाप्रति त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल एक मिनिट मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली.**

**-----------------------------------------**

**विधानसभा अध्यक्ष नार्वेकर- उपमुख्यमंत्री अजित पवार**

**प्रत्येक जिल्हा रुग्णालयांमध्ये जिल्हा वार्षिक निधीमधून सीटी स्कॅन आणि एमआरआय मशीन देण्यात येतील, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधीमंडळात दिली. जिल्हा रुग्णालयांसाठी वार्षिक निधीतून तरतूद करण्याची अथवा विशेष निधी देण्याची सूचना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली होती. त्यावर अजित पवार यांनी ही माहिती दिली.....**

*(होल्ड बाईट-विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार)*

*मुंबईसारख्या ठिकाणी सेंट जॉर्ज जीटी, कामा आणि जेजे हे प्रमुख हॉस्पिटल आहे जिकडे राज्यभरातले पेशंट येतात. इकडे पण मोठ्या प्रमाणात सिटी स्कॅन*

*आणि एमआरआय मशीनची कमतरता आहे. दोन महिन्यांपासून मी स्वतः पाठपुरावा करतो आहे. तरीही या सिटी स्कॅन आणि एमआरआय मशीन जेवढ्या आवश्यक आहे तेवढ्या देण्यात आल्या नाही आहे.*

*आपण जी सूचना केलेली आहे. तश्याप्रकारे नियोजन विभागाच्या तर्फे सूचना देण्यात येतील, की ज्या जिल्हयाला वार्षिक योजनेला पैसे दिलेले त्या पैश्यातून आम्ही ज्या रकमा ठरवून देऊ, साधारण चांगल्या कंपनीचे काय आणि त्या रकमेमध्ये त्यांनी जर घ्यायचा ठरवलं तर त्यालाही आम्ही मान्यता देऊ.*

दरम्यान, ज्या जिल्हा रुग्णालयांतील असुविधांविषयी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्याची दखल घेऊन योग्य ती कारवाई करण्यात येईल, असं वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

-----------------------------------------

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे

राज्यात शालेय विद्यार्थ्यांपैकी ८६ टक्के विद्यार्थ्यांच्या अपार आयडीचं काम पूर्ण झालं आहे. तर, विद्यार्थ्यांचे आधार संलग्न करण्याचे काम ९५ टक्के पूर्ण झाल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आज विधीमंडळात दिली. शालाबाहृय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी १ ते १५ जुलैदरम्यान विशेष मोहीम राबवण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. विद्यार्थ्यांना विविध सुविधा पुरवण्यावर सरकारचा भर असल्याचं भुसे यांनी सांगितलं, ते म्हणाले -

*(होल्ड बाईट - शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे)*

*येणाऱ्या काळामध्ये आणखी जास्तीत जास्त आणि भौतिक सुविधा पण आपल्याला कशा देता येतील? शुद्ध पिण्याचं पाणी असेल, स्वच्छतागृह असतील, शाळेच्या चांगल्या इमारती असतील, आमचा शिक्षक बंधू भगिनी सुद्धा अतिशय प्रशिक्षण घेऊन त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना पवित्र ज्ञानदानाचा कार्य करण्याच्यासाठी सिद्ध होत आहे.*

-----------------------------------------

बार्टी, सारथी

बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये यापुढे विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारावर विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येणार आहे. या संस्थांमधली विद्यार्थ्यांची संख्या, सर्वसाधारण शिष्यवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रियेबाबत समान धोरण राबविण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित

पवार यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल आला आहे. त्यावरुन लवकरच निर्णय घेऊ असं ते म्हणाले.

---------------------------------------

आषाढी एकादशी-रेल्वे

आषाढी एकादशी निमित्य विठूरायाच्या दर्शनासाठी ओढ लागलेल्या वारकऱ्यांना पंढरपूरच्या दिशेने घेऊन जाणारी रेल्वेची विठ्ठल दर्शन एक्सप्रेस गाडीची पहिली फेरी बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव रेल्वे स्थानकावरून पंढरपूरच्या दिशेने मार्गस्त झाली आहे. यावेळी वारकऱ्यांच्या स्वागतासाठी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव उपस्थित होते त्यांनी या विठ्ठल दर्शन एक्सप्रेस ला हिरवी झेंडी दाखवली. आज गेलेल्या विठ्ठल दर्शन गाडीमध्ये 1 हजार 629 विठ्ठल भक्त पंढरपूरला रवाना झाले आहे.

---------------------------------------

थालेसीमिया

राज्यात विवाहपूर्व थालेसीमिया रोगाची चाचणी करणं बंधनकारक करण्यात येईल अशी ग्वाही सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी आज विधानसभेत दिली. याबाबत आमदार विकास ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. राज्यात बारा हजार आठशे थालेसीमिया रुग्ण असल्याचं सांगत, प्रत्येक जिल्ह्यात या रोगाची उपचार केंद्र सुरू करण्यात येतील अशी माहिती बोर्डीकर यांनी दिली.

---------------------------------------

वाळू आणि रेती

वाळू आणि रेती वाहतुकीसाठी चोवीस तास परवानगी देण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी जीपीएस प्रणाली आणि सीसीटीव्ही कॅमेरा पद्धती लागू केली जाणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत एका निवेदनाद्वारे दिली. यानुसार आता संध्याकाळी सहा नंतर महाखनिज या पोर्टलवरून वाहतूक परवाना दिला जाईल असं त्यांनी सांगितलं. "सद्यस्थितीत सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच वाळूचे उत्खनन परवानगीने होते. पण दिवसभरात साठवलेली वाळू रात्री उचलता न आल्यामुळे वाहतूक क्षमतेचा योग्य उपयोग होत नाही आणि त्यामुळे अवैध वाहतूक वाढते. ही परिस्थिती

बदलण्यासाठी महाखनीज पोर्टलवरून २४ तास ईटीपी तयार करता येईल अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

---------------------------------------

हवामान

येत्या काही तासात बुलडाणा, यवतमाळ, अकोला, वाशीम, अमरावती येथे काही ठिकाणी विजांसह  वादळ येण्याची शक्यता आहे. नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया इथं  बहुतेक ठिकाणी यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली इथं  अनेक ठिकाणी, वाशीम इथं  काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

---------------------------------------

जगन्नाथ स्वामी यात्रा

नागपुरातील प्राचीन असलेल्या जगन्नाथ स्वामी मंदिर रामपेठ येथून आज भगवान जगन्नाथ, भाऊ बलभद्र आणि बहीण सुभद्रा यांची रथयात्रा काढण्यात आली. बँड पथकासह, टाळ मृदुंगच्या गजरात, भजन म्हणत, भक्तिमय वातावरणात, देव देवतांचे, महापुरुषांचे पोशाख परिधान करून रथयात्रा काढण्यात आली. आरती झाल्यानंतर ज्याप्रमाणे पुरी येथे भगवान जगन्नाथ यांचा रथ भक्त ओढतात त्याच प्रमाणे नागपूरात देखील भक्ता द्वारे हा रथ ओढल्या जातो.

---------------------------------------